☒

श्री

# देशाची सद्य स्थिती

१० जुलै १९९९

स्कॅम घोटाळ्यात सोन्याचा धूर आहे
पार्टी नेता इलेक्शन मध्ये चूर आहे
त्याचे आश्वासन थातुर मातुर आहे
कागदावर फक्त योजना मंजूर आहे —१

सुव्यवस्थे बद्दल जनतेची कुरकुर आहे
गुंड बदमाशांची उडी चौखूर आहे
पोलिस पहारेकरी डाराडूर आहे
म्हणून सुराज्य अजून फार दूर आहे —2

विद्यार्थ्यांमध्ये कपड्याचा नूर आहे
ललनांमध्ये मेकपचा गरूर आहे
समान हक्कांसाठी स्त्रियांची टुरटुर आहे
एखादी सासू किंवा सून मगरूर आहे — 3

आसाम बिहारमध्ये नद्यांना महापूर आहे
देशात इतरत्र फक्त पावसाची भुरभुर आहे
पुष्कळ ठिकाणी पाण्याची जरूर आहे
पण जनता अनेक वर्षा पासून सबूर आहे —४

घूसखोर अरेरावी व क्रूर आहे
भारतावर आक्रमणाचा सूर आहे
भारतीय जवान लढण्यात शूर आहे
देशाभिमानाने भरलेला त्याचा ऊर आहे —५

कारगील मध्ये रक्ताचा पूर आहे
कुटुंबा बद्दल त्याचे मनात हुरहुर आहे
शत्रूच्या दुष्टाव्याबद्दल ~~मनात~~ मनात काहूर आहे
मानवते साठी त्याचे तुऱ्यात पीस मयूर आहे. —६

द. वि. लेले
[signature]